# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक-15.05.2026** **वार- शुक्रवार**

---

**आवास योजना**

"महाराष्ट्राला एका वर्षात ३० लाख घरांचं उद्दिष्ट मिळालं असून आज आपण पाच लाख बेघर लोकांना घरांच्या चाव्या सुपूर्द करत आहोत. पुढील वर्षी 15 लाख लोकांना चाव्या सुपूर्द करु. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सर्वांना पक्की घरे या स्वप्नाच्या पूर्तीसाठी अहोरात्र काम करुन येत्या पाच वर्षात महाराष्ट्रातील प्रत्येक बेघराला पक्क घर देऊ", अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण अंतर्गत केंद्र शासनाने महाराष्ट्रासाठी 30 लाख घरं मंजूर केली आहेत. त्यातील पाच लाख घरांचा लोकार्पण सोहळा आणि महाआवास अभियान राज्यस्तरीय पुरस्कार वितरण कार्यक्रम साताऱ्यातील सैनिक स्कूलच्या मैदानावर पार पडला. त्यावेळी मुख्यमंत्री बोलत होते.

"30 जून पुर्वी शेतकऱ्यांना कर्ज माफी देण्यात येईल. नियमित कर्ज फेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन अनुदानही देण्यात येईल. कांदा उत्पादक शेतकरी अडचणीत असल्याने केंद्रीय कृषी मंत्री यांना विनंती केल्यानुसार त्यांनी आजपासूनच 12 रुपये 35 पैसे दराने कांदा खरेदी सुरु केली आहे," असं ही शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत बोलताना मुख्यमंत्री म्हणाले.

**वाहन कपात**

पंतप्रधानांच्या इंधन कपातीच्या आवाहनानुसार पुण्यातही उपाययोजना सुरू झाल्या आहेत. आवश्यक सुरक्षा कायम ठेवत अतिमहत्त्वाच्या व्यक्तींच्या दौऱ्यातील ताफ्यातील वाहनांची संख्या कमी करण्यात येत आहे. त्यानुसार नव्या पद्धतीने दौऱ्यांचं नियोजन केलं जात आहे, अशी माहिती पुण्याचे पोलिस आयुक्त अमितेशकुमार यांनी आज दिली. यापुढे बाहेरगावी होणाऱ्या दौऱ्यांमध्ये निश्चित करण्यात आलेल्या संख्येपेक्षा अधिक वाहने ताफ्यात सहभागी होणार नाहीत. या निर्णयाची काटेकोर अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संबंधित पोलिस आयुक्त आणि पोलिस अधीक्षकांवर सोपविण्यात आली आहे, अशी माहितीही त्यांनी दिली.

**सुनेत्रा पवार**

पुणे जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाला अधिक गती देण्यासाठी सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत तब्बल एक हजार ४७२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. गतवर्षीच्या तुलनेत यंदा ९३ कोटी रुपयांची वाढ करण्यात आली असून पायाभूत सुविधा, पर्यटन, आरोग्य, शिक्षण आणि ग्रामीण विकासाशी संबंधित महत्त्वाकांक्षी प्रकल्पांना विशेष प्राधान्य देण्यात आलं आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली विभागीय आयुक्त कार्यालयात दूरदृश्य प्रणालीद्वारे आयोजित जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत विकासकामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

**जलवाहिनी**

पेशवेकालीन कात्रज ते शनिवारवाडा भूमिगत जलवाहिनीच्या जीर्णोद्धार आणि संवर्धनासाठी पुणे महापालिकेनं महत्त्वाचं पाऊल उचललं आहे. या कामाला स्थायी समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली असून सर्वसाधारण सभेची मंजुरी मिळाल्यानंतर जलवाहिनीच्या पुनरुज्जीवनासाठी सर्वेक्षण आणि प्रकल्प आराखडा तयार करण्यात येणार आहे.

**कामबंद**

जलजीवन मिशनअंतर्गत पुणे जिल्ह्यात सुरू असलेल्या पाणीपुरवठा योजनांची कामं निधीअभावी ठप्प झाली आहेत. शासनाकडून अपेक्षित निधी उपलब्ध होत नसल्याने तब्बल ६०४ योजना अर्धवट अवस्थेत रखडल्या असून त्याचा फटका ग्रामीण भागातील नागरिकांना बसत आहे. जिल्ह्यात प्रत्येक घरापर्यंत नळाद्वारे पाणी पोहोचविण्याच्या उद्देशाने जलजीवन मिशनअंतर्गत एक हजार २३९ योजना मंजूर करण्यात आल्या होत्या. सन २०२०-२१ पासून या योजनांसाठी शासनाकडून निधी उपलब्ध करून देण्यात आला. २०२४ पर्यंत निधीचा पुरवठा नियमितपणे होत होता.

**नवे प्रकल्प**

पुणे महापालिकेत समाविष्ट झालेल्या सात गावांमधील पाणीपुरवठा आणि सांडपाणी वाहिन्यांच्या प्रकल्पांसाठी आता केंद्र सरकारच्या 'अर्बन चॅलेंज फंड'अंतर्गत पुणे महापालिकेला लवकरच ७१० कोटी रुपयांचा निधी मिळणार आहे. देशातील प्रमुख शहरांमधील पायाभूत सुविधा विकासासाठी केंद्र सरकारने चार लाख कोटी रुपयांचा निधी राखून ठेवला असून त्यातून पुणे, पिंपरी-चिंचवड आणि नाशिक महापालिकांनी राज्य सरकारमार्फत प्रस्ताव सादर केले होते. पुण्याला मिळणाऱ्या निधीतून वाघोली, मांजरी, हंडेवाडी-औताडेवाडी,शेवाळवाडी, बावधन, वडाचीवाडी आणि होळकरवाडी या भागांमध्ये सांडपाणी प्रक्रिया केंद्रे उभारण्यात येणार आहेत. दरम्यान, अमृत योजनेअंतर्गत सुरू असलेली सुमारे ३५० कोटी रुपयांची कामेही सुरूच राहणार आहेत.

**भूसंपादन**

पुरंदर येथील प्रस्तावित आंतरराष्ट्रीय विमानतळाच्याभूसंपादन प्रक्रियेला वेग आला असून, मोबदल्याचे सूत्र निश्चित झाल्यानंतर शेतकऱ्यांकडून संमतीपत्रे देण्यासमोठा प्रतिसाद मिळत आहे. आतापर्यंत ९२० एकर जमिनींसाठी शेतकऱ्यांनी जिल्हाप्रशासनाकडे संमती दर्शवली असून, गेल्या चार दिवसांत तब्बल११५ कोटी रुपयांच्या मोबदल्याचे वितरण करण्यात आले आहे.याबाबतची माहिती जितेंद्रडुडी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

**कामगार**

केंद्र शासनाच्या 'स्मार्ट सिटी मिशन'अंतर्गत स्थापन करण्यात आलेली स्मार्ट सिटी कंपनी बंद करण्याचानिर्णय राज्य शासनाने घेतल्यानंतर तेथील कर्मचाऱ्यांच्या भवितव्याचा प्रश्न निर्माण झाला होता. या पार्श्वभूमीवर कंपनीतील १४ अनुभवी कर्मचाऱ्यांना सेवेतून कमी न करता महापालिकेत एकवट मानधनावर सामावून घेण्याच्या प्रस्तावाला स्थायी समितीने मंजुरी दिली आहे. याबाबतची माहिती स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी दिली.

**कचरा**

पुण्यातील बालेवाडी परिसरात वाढत्याकचऱ्याच्या समस्येवर उपाय म्हणून महापालिकेने पीएमपी बस डेपोची मोकळी जागा कचरासंकलन केंद्रासाठी उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला आहे. स्थायी समितीच्या बैठकीत यास मंजुरी देण्यात आली.

**नोटिस**

बांधकाम प्रकल्पांमधून उडणाऱ्या धुळीमुळे शहरातील प्रदूषणात वाढ होत असल्याच्या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड महापालिकेने १७९ बांधकाम व्यावसायिकांना नोटिसा बजावल्या आहेत. प्रदूषण नियंत्रणासाठी महापालिकेने दिलेल्या नियमावलीची काटेकोर अंमलबजावणी करावी, अन्यथा दंडात्मक कारवाईसह बांधकाम परवानगी स्थगित करण्याचा इशाराही प्रशासनाने दिला आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान 37 तर किमान तापमान 25 पूर्णांक 07 दशांश अंश सेल्सियस नोंदवलं गेलं. उद्याही तापमान साधारण 40 अंश सेल्सियस असेल आणि दुपारनंतर आकाश अंशतः ढगाळ राहण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं वर्तवली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**